पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०४

**सभावृत्तांत**

**दिनांक - २४/०७/२०१९** **वेळ - दुपारी १२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **२४/०७/२०१९** रोजी दुपारी **१२.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१.मा.लांडगे राजेंद्र किसनराव - सभापती**
२.मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
३.मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
४.मा.कोकणे संतोष अंकुश
५.मा.वाबळे संजय मल्हारराव

या शिवाय मा.इंदलकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.खडतरे – उप अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) झोन बदलणेबाबत.- मा.कैलास बारणे, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

-------------

दिनांक १०/०७/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०३) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक – ६ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २४/०७/२०१९ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.संतोष कोकणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५ दि.११/०५/२०१५

विषय :- पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिण्णोत्तर १२.०० मी.रूंद रस्त्यापासुन ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै मधील २४ व १२ मी.रुंद ( पुर्व-पश्चिम ) रस्त्याचे भूसंपादनाबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार दि.२५/०९/२०१९ चे सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २४/०७/२०१९ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.संतोष कोकणे अनुमोदक : मा.कैलास बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/११/मोशी/२०६/२०१९ दि.१७/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे मोशी, ता. हवेली येथील गट नं ६४६ पै (जुना गट नं ६४९ पै) मधील ५ एकर गायरान क्षेत्र मुस्लिम दफनभूमीसाठी आरक्षीत ठेवणेचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मुंबई यांना पत्र क्र नरवि/कावि/३क/१४०/२०१०, दि.०१/१२/२०१० अन्वये सादर करणेत आला होता. मा.जिल्हाधिकारी, महसुल शाखा, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र पमह-१/कावि/६०३/२०१९, दि.०५/०३/२०१९ अन्वये मौजे मोशी, ता.हवेली येथील ग.नं. ६४६ (जुना ग.नं. ६४९) मधील ५ एकर क्षेत्र मुस्लिम दफनभूमीसाठी पिंपरी चिंचवड महापालिकेस कब्जेहक्काने मंजुर करणेबाबत शासन ज्ञापनाव्दारे मंजूरी दिली असून सदर जागेचे मुल्यांकन रक्कम रूपये ८,३४,०१,५००/- शासन जमा करणेबाबत कळविले आहे. मौजे मोशी भागामध्ये मुस्लिम दफनभूमि नसल्यामुळे स्थानिक नागरिकांमार्फत दफनभूमिसाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत वारंवार मागणी होत आहे. नागरिकांच्या मागणीचा विचार करता, सदर बाब तातडीची असल्याने मौजे मोशी, ता. हवेली येथील गट नं ६४६ पै (जुना गट नं ६४९ पै) मधील ५ एकर क्षेत्र मुस्लिम दफनभूमिसाठी आरक्षित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव मा. महापालिका सभेची मान्यता घेऊन शासनाकडे मान्यतेकामी सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रस्तावातील निवासी विभागातील जागा सार्वजनिक उपयोगासाठी दफनभूमीसाठी आरक्षित करणेच्या शासनाच्या मान्यतेनंतर विनामोबदला आरक्षणाची जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून घेणे उचित होईल व महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे होईल असे इकडील विभागाचे मत आहे. तरी, मौजे मोशी, ता. हवेली येथील गट नं ६४६ पै ( जुना गट नं ६४९पै ) मधील निवासी विभागातील शासनाच्या ताब्यातील ५ एकर क्षेत्र मुस्लिम दफनभूमिसाठी आरक्षित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव मा. महापालिका सभेची मान्यता घेऊन, फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २४/०७/२०१९ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.संतोष कोकणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/११७/२०१९ दि.१८/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस - १८०५

।१०५०।प्र.क्र.७९५।०७।नवि-१३, दि. ९ जुलै २००८, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०९।१९८५/प्र.क्र. १८९३।०९।नवि-१३, दि. १८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस- १८१२।१६०।प्र.क्र.५८।१२/पुर्नबांधणी क्र.२७।१२/ई.पी.- मंजूरी/नवि-१३ दि. ०२।०३।२०१५ अन्वये मंजूर असलेल्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेमध्ये मौजे वाकड ता. मुळशी येथील स.नं. १११ पै., ११२ पै., १२२ पै. मधील आ.क्र.४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो हे आरक्षण प्रस्तावित आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे वाकड मधील स.नं.१११ पै.,११२ पै., १२२ पै. मधील आ.क्र.४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो चे आरक्षण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आहे. सदर आरक्षणाचे एकूण जागेपैकी ६००० चौ.मी. (६० गुंठे) जागा टी.डी.आर.चे मोबदल्यात मनपाच्या ताब्यात आलेली आहे. उर्वरीत जागा लवकरात लवकर मनपाचे ताब्यात घेणेकरीता मौजे वाकड मधील स.नं. १११ पै., ११२ पै., १२२ पै. मधील आ. क्र. ४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो या आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त मौजे वाकड मधील स.नं. १११ पै., ११२ पै., १२२ पै.मधील आ. क्र. ४/३८ ट्रक टर्मिनन्स, पार्किंग व पीएमपीएमएल डेपो या आरक्षणाखालील जमिनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाखालील जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ ( नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणे करिता मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ९ विषय क्रमांक - ०४
दिनांक - २४/०७/२०१९ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर
संदर्भ – मा.कैलास बारणे ,मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडुन विकास आराखडयामधील १९९७ साली त्याचे फक्त विकास आराखडा मधील नियोजन नियंत्रणाखालील क्षेत्र सुध्दा महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आलेले आहे. त्यापैकी रावेत येथील सर्व्हे नं.२१९, २२०, २२१, २२२, २२३ तसेच सर्व्हे नं.१२३ ते १३१ या मधील जागा हया हरीत व शेती व ना.विकासामध्ये आहेत. परंतु हया जमिनी वाल्हेकरवाडी ते रावेत ३४.५० मी रुंद रस्त्याचे उत्तरेला व दक्षिणेला असणा-या जमिनी तीनही बाजुंनी निवासी व रहिवासी झोन आहे. त्यामुळे आजुबाजूस सद्यपरिस्थितीत येथील शेतक-यांना शेती करणे शक्य होत नाही. शेतक-याची मानसिकता पाहता तेथे झोपडपट्टी होऊ शकते. तरी रावेत नाल्याच्या पश्चिमेकडील व पवना नदीच्या पुर क्षेत्राच्या (ब्ल्यु-लाईन) बाहेरील मौजे रावेत येथील सर्व्हे क्र.१२३ ते १३१ पैकी तसेच सर्व्हे नं.२१९ ते २२३ शेती ना विकास विभाग व हरित विभागातील जागांचा वापर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन रहिवास विभागात

समाविष्ट करणेस व आवश्यक ती सर्व कार्यवाही (फेरबदलाची कार्यवाही) करुन प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **राजेंद्र किसनराव लांडगे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/३/कावि/२४९/२०१९
दिनांक : २४/०७/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.